आदूर गोपालकृष्णन, अशोक राणे, इतर सर्व मान्यवर आणि उपस्थित चित्रपटरसिकांना सस्नेह नमस्कार.

औरंगाबाद आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाने त्यांचा पहिला वहिला जीवनगौरव पुरस्कार मला दिल्याबद्दल मी मनःपूर्वक आभार व्यक्त करतो. महिन्यापूर्वी झालेल्या डोळयाच्या दुखापतीवरील इलाज म्हणून कालच छोटी शस्त्रक्रिया करायला लागली. त्यामुळे प्रत्यक्ष उपस्थित राहून हा सन्मान स्वीकारू न शकल्याबद्दल सर्वांची मनोमन क्षमा मागतो. आणि आयोजकांपासून ते इथे उपस्थित तुम्हा सगळयांना शब्द देतो की लवकरच भेटीचा आणि प्रत्यक्ष संवाद साधण्याचा योग आपण घडवून आणूया.

ह्या महोत्सवाच्या 'थीम'मध्ये, भारतीय चित्रपटसृष्टीच्या आजवरच्या वाटचालीतले दैदीप्यमान क्षण निवडले आहेत. त्या झगमगाटात माझ्या मनाची पकड घेतली ती मात्र 'दो बिघा ज़मीन'च्या कृष्णधवल दृष्यांनी!!! बिमल रॉय दिग्दर्शित या सिनेमामुळे १९५० च्या दशकात समांतर चित्रपट चळवळीचं बीज रोवलं गेलं. भारतीय सिनेमाच्या वाटचालीचं सिंहावलोकन करताना, मुख्यधारेतल्या आणि धंदेवाईकरीत्या यशस्वी ठरलेल्या चित्रपटांची उजळणी करण्याकडे सर्वसाधारण कल दिसतो. आजकाल तर सिनेमा 'किती कोटींच्या क्लबमध्ये गेला' या एकमेव मोजमापाने चित्रपटाची गुणवत्ता मोजली जाताना दिसते. ह्या बाजारू वातावरणात तुमच्या महोत्सवाने समांतर चित्रपट चळवळीची दखल घेणं, कौतुकास्पद आहे.

पन्नासच्या दशकात उगवलेली ही समांतर चित्रपट चळवळ पुढे ७० आणि ८० च्या दशकांमध्ये बहरली. तो कालखंड सर्वार्थाने भारतीय चित्रपटसृष्टीचा Renaissance period मानला जातो. माझी संपूर्ण जडणघडण त्या कालखंडातच झाल्यामुळे मला एकाच वेळी दृष्यकला, नाटयकला आणि चित्रपट अशा तीन तीन कलक्षेत्रांत मुक्तसंचार करता आला, याचं भान मला आहे. आणि त्यामुळेच त्या कालखंडातलं एक उत्तुंग व्यक्तीमत्व आदूर गोपालकृष्णन यांच्या हस्ते हा सन्मान आज मला मिळणं, हासुध्दा माझ्यासाठी भारावून टाकणारा क्षण आहे. आदूरचा पहिला चित्रपट 'स्वयंवरम्' आणि माझं पहिलं पदार्पण 'शांतता कोर्ट चालू आहे' या दोन्ही कलाकृती ७१-७२ मध्ये रसिकांसमोर आल्या, हा योगायोग

वैयक्तिक पातळीवर माझ्यासाठी जिव्हाळयाचा आहे. तेव्हापासून आजवर अदूरबरोबर असलेले आत्मीयतेचे संबंध आणि परस्परांबद्दल वृध्दींगत होत गेलेला आदरही माझ्यासाठी महत्वाचा आहे. So thank you Adoor! It's my loss that on account of my eye surgery, I could not remain present today to accept this award and get your blessings! Once again my apologies!

आपल्या देशातला पहिला आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव १९५२ साली भरवला गेला हे बहुतेकांना माहीत असेल. त्यामध्ये दाखवल्या गेलेल्या 'बायसिकल थीव्ज' या इटालियन चित्रपटाने सत्यजित रे, बिमल रॉय आणि राज कपूर सारखे दिग्गज प्रभावित झाले आणि भारतीय चित्रपटसृष्टीने एक अतिशय वेगळंच वळण घेतलं, हे कदाचित थोडया लोकांना माहीत असेल. त्यातूनच पुढे फिल्म सोसायटी चळवळीचा उदय झाला आणि आमच्या पिढीला नवीन चित्रभाषेचा शोध घेण्याची स्फूर्ती मिळाली. आंतरराष्ट्रीय स्तरावर सिनेमा माध्यमामध्ये होणारे सर्जनशील प्रयोग आम्ही बघू शकलो. सगळयात महत्वाचं म्हणजे ह्या सगळया वाटचालीतून एक सुजाण प्रेक्षकही तयार व्हायला सुरूवात झाली. चित्रपट/माहितीपट महोत्सव, स्पर्धा, कार्यशाळा, film appreciation courses इत्यादी उपक्रमांचं मोल अपार आहे. शक्य तेवढया पध्दतीने रसिक म्हणून आणि सिनेमाचे अभ्यासक म्हणून अशा उपक्रमांचा लाभ घ्या आणि त्यांना हातभार लावा. प्रेक्षक म्हणून, चांगला सिनेमा म्हणजे काय हे समजून घेणं, तो रूजवणं आणि दर्जेदार सिनेमा संस्कृती वृध्दिंगत होण्यासाठी पोषक, कलात्मक आणि कलासक्त वातावरण तयार करणं, हे सगळं तुमच्या हातात आहे. ही जबाबदारी मनावर घेतली नाही तर निर्बुध्द सिनेमाच तुमच्या पदरी पडेल आणि त्याचं कारणही तुम्हीच असाल!

'दो बिघा ज़मीन'चा पुन्हा एकदा आवर्जुन उल्लेख करावासा वाटतो तो त्याच्या सामाजिक भानाविषयी आणि कलाकृतींच्या व कलाकारांच्या सामाजिक बांधिलकीच्या संदर्भात! सध्याच्या सांस्कृतिक, सामाजिक, राजकीय वातावरणातल्या मुस्कटदाबीच्या पार्श्वभूमीवर हा मुद्दा विशेष महत्वाचा ठरतो. व्यवस्थेकडून आविष्कार स्वातंत्र्यावर अंकुश ठेवण्याचे अथक प्रयत्न होत असतील, विरोध दडपण्यासाठी नवनवे वार, वेगवेगळया पध्दतीने केले जात असतील, सत्य लपवून सोयिस्करपणे

घेतलेली परिस्थिती वास्तव म्हणून गळी उतरवली जात असेल, दिवसा ढवळया हिंसेला खतपाणी घातलं जात असेल आणि मानवी समूहांमध्ये भरून न येणारे दुभंग रीतसर पेरले जात असतील, तर या सगळया विरूध्द संघर्ष उभारण्याचं काम कलाकारांनी उघडपणे केलं पाहिजे, ही माझी ठाम भूमिका आहे. कला, कलाकार आणि कलाकृती यांमध्ये एक अंतर्गत उर्मी असते जिच्या ठिणगीमध्ये सत्तेला आव्हान द्यायची ताकद असते. ती ताकद समांतर प्रवासातूनच उत्कट होते. “Alternatives” lead to healthy contingents in the dialectical process. Many times alternatives germinate social movements. Alternatives have the power to counter/rebel against the prevalent dominant ideas/beliefs and values of a culture. Alternatives because of its propensity to create subversive atmosphere are not welcomed by the mainstream. Thus the antithetical equation of alternatives *qua* mainstream is a classical binary conflict. If we look at our socio-political scenario in last decade, alternatives have proven to be the most popular channels of social change and social justice. Thus, as the tangible replacements are more visible such as landlines by cell phones, desk tops by laptops, printed books by e-books & Kindle, actual currency by credit cards, tailored clothes by readymade garments, stunt performances by computer graphics, human labour by machines, electricity by solar panels, live performances by recorded music… and so on; Alternatives in socio-political life are equally discernible. Rise of AAP, mass support given to Anna Hazare and Nirbhaya, massive mandate given to the Prime Minister Modi, group therapies or movements like Alcoholic Anonymous, encouragement to citizen journalism, grants through CSR, community radio and other forms of alternative media etc. have dominated the social engagement while changing the conventional paths. आजच्या परिस्थितीत कलाकारांनी लोकशाही टिकवण्याची स्वतःची जबाबदारी पाळली नाही तर इतिहासात भावी पिढयांनी आपली नोंद षंढ म्हणून केली तर वावगं ठरणार नाही. महोत्सवाच्या आयोजकांनीही असा प्रेरणादायी सिनेमा रसिकांपर्यंत पोहोचावा म्हणून विशेष प्रयत्न करावेत.

थोडक्यात काय तर प्रेक्षक म्हणून, कलाकार म्हणून, आयोजक म्हणून आपण सगळयांनीच आपापली जबाबदारी सजगतेने पार पाडूया. तरच असे सोहळे ख-या अर्थाने सार्थ ठरतील.

यंदाच्या औरंगाबाद आंतरराष्ट्रीय महोत्सवामुळे जागतिक स्तरावर उठणारे नवे तरंग तुम्हाला अनुभवायला मिळाले असतील. त्याच बरोबर आपल्या मराठीमध्ये उमटणा-या आगळया वेगळया हुंकारांची चाहूलही लागली असेल. मागे वळून बघताना विस्मरणात गेलेल्या महत्वाच्या कलाकृतीतून नवीन प्रेरणा मिळाली असेल. या सगळयामुळे, कोणताही पूर्वग्रह न बाळगता चित्रपटकलेवर निखळ प्रेम करणारा चित्रपट रसिकही इथे वृध्दींगत होईल याची मला खात्री आहे. तुमच्या भावी उपक्रमांसाठी मी खूपखूप शुभेच्छा देतो. तुमच्या पुढील वाटचालीत मी काही योगदान देऊ शकत असेन तर मला हक्काने बोलवा. मी हजर असेन.

हे नवं वर्ष आपणा सर्वांना उत्कृष्ट सिनेकलाकृतींच्या रसास्वादामुळे अविस्मरणीय ठरो, ही सदिच्छा व्यक्त करतो.